## श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

## स्वच्छता साहित्याचे दरपत्रक

स्वच्छता विभागासाठी विविध प्रकारचे स्वच्छता साहित्य खरेदी करणेकामी दरपत्रके मागविणेत येत आहेत. याबाबतची सर्व माहिती श्री. संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप व www.vitthalrukminimandir.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

क्र.स्वच्छता./कावि/१३७/२०१९ दि.०१/०३/२०१९.

संपर्क क्र. ०२१८६–२२४४६६

| | |
|---|---|
| **स्वा/–** | **स्वा/–** |
| **(बालाजी पुदलवाड)** | **(सचिन ढोले)** |
| **व्यवस्थापक** | **कार्यकारी अधिकारी** |
| **श्री.वि.रू.म.स.प.** | **श्री.वि.रू.म.स.प.** |

# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

स्वच्छता साहित्य पुरवठा कामाचे जाहीर दरपत्रक.

**माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे.....**

१. नमूना दरपत्रक कार्यालयीन वेळेत श्री. संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप, पंढरपूर येथे व www.vitthalrukminimandir.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. दरपत्रक स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक स्वच्छता साहित्य पुरवठा कामी भरलेले आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा. दरपत्रक दि.१०/०३/२०१९ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत समक्ष श्री. संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे सादर करावे किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेले व अपूर्ण दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.

२. पुरवठादाराने दरपत्रक फॉर्ममध्ये नमुद केलेल्या दराने दि.०१/०४/२०१९ ते दि.३१/०३/२०२० या कालावधीत इकडील मागणीप्रमाणे स्वच्छता साहित्याचा पुरवठा करणे आवश्यक आहे.

३. पुरवठा करावयाच्या स्वच्छता साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पुरवठा करावयाच्या वस्तूचा तपशील | अंदाजे वर्षभर पुरवठा करावयाचा माल (किलो/नग/लिटर) |
|---|---|---|
| १ | ब्लिचींग पावडर | ५०० किलो |
| २ | लहान टोच्या पुसणी | २०० नग |
| ३ | मेडिक्लोर | २०० लिटर |
| ४ | काथ्या बंडल | १ नग |
| ५ | वायपर लहान | १० नग |
| ६ | ब्लॅक फिनेल | ८०० लिटर |
| ७ | व्हाईट सिंटेड फिनेल | १००० लिटर |
| ८ | ॲसिड | २५० लिटर |
| ९ | ओडोपीक पावडर | २० किलो |
| १० | पांढरी डांबर गोळी | ५ किलो |
| ११ | रंगीत डांबर गोळी | १०० नग |
| १२ | खराटे | २४० नग |
| १३ | झाडू | २०० नग |
| १४ | रूम फ्रेशनर | २० लिटर |
| १५ | तारेची घासणी | ५० नग |
| १६ | निरमा | ५०० किलो |
| १७ | बायडींग तार | २५ किलो |

४. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या नमुन्यांतच मालाचा पुरवठा करणेचा आहे.

५. सर्व साहित्य चांगल्या गुणवत्तेचे असणे आवश्यक आहे.

६. स्वच्छता साहित्य विक्रीची परवानगी असलेबाबत सर्व प्रकारच्या शासकिय परवान्याच्या प्रती दरपत्रक अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

७. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किमतीच्या ५% पर्यंत दंड आकारण्यात येईल.

८. माल खराब असल्याचे आढळून आलेस पुरवठाधारकास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

९. पुरवठा करण्यात आलेल्या मालाची प्रत व प्रमाण संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही.

१०. स्वच्छता साहित्य पुरवठा करणेचे ठिकाण श्री.संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप विभाग, पंढरपूर येथे करणे आवश्यक आहे.

११. दरपत्रकात नमुद साहित्याचा दर सर्व करासहीत नमुद करावा. साहित्य पोहचविण्याचा वाहतुक खर्च, हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठाधारकास दिला जाणार नाही.

१२. दरपत्रकात नमुद सर्व साहित्यांचा दर नमूद करणे आवश्यक आहे. अपूर्ण दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१३. सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २% आयकर कपात केली जाईल.

१४. सदर कामासाठी कोणतीही ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

१५. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस निविदाधारक जबाबदार राहील.

१६. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहील.

१७. दरपत्रक ज्यांचे नांवे मंजूर होईल, त्यांनी रक्कम रू.१००/— चे स्टॅम्पपेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (affidivit) प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

१८. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१९. वरील कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखून ठेवला आहे. तसेच पुरवठाधारकांच्या कोणत्याही प्रकारच्या अटी व शर्ती मंदिर समितीवर बंधनकारक नसतील.

२०. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर दरपत्रक कोणत्याही क्षणी रद्द केले जाईल.

२१. प्रशासकीय व अन्य कारणास्तव दरपत्रक प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

**दरपत्रक अर्ज**

**प्रति,**

**मा. कार्यकारी अधिकारी,**
**श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,**
**पंढरपूर, जि. सोलापूर.**

**विषयः—** स्वच्छता साहित्य पुरवठा करणेकामी दरपत्रक.

**ठेकेदाराचे पूर्ण नाव :—** श्री.————————————————————————

**पूर्ण पत्ता :—** ————————————————————————

————————————————————————

**मोबाईल कं.:—** ————————————————————————

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरचे वतीने स्वच्छता साहित्य पुरवठा कामाच्या दै. —————, सोलापूर मध्ये दि.०४/०३/२०१९ रोजी प्रसिध्द झालेल्या जाहिरातीप्रमाणे आमच्याकडे उपलब्ध असलेल्या स्वच्छता साहित्याचे दरपत्रक खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

| अ. क्र. | पुरवठा करावयाच्या वस्तूचा तपशील | ब्रँडचे नांव / दर्जा | परिमाण | दर प्रती किलो / नग/लिटर रक्कम | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अंकी | अक्षरी | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | ब्लिचींग पावडर | उत्तम | किलो | | | |
| २ | लहान टोच्या पुसणी | उत्तम | नग | | | |
| ३ | मेडिक्लोर | उत्तम | लिटर | | | |
| ४ | काथ्या बंडल | उत्तम | नग | | | |
| ५ | वायपर लहान | उत्तम | नग | | | |
| ६ | ब्लॅक फिनेल | उत्तम | लिटर | | | |
| ७ | व्हाईट सिंटेड फिनेल | उत्तम | लिटर | | | |
| ८ | ॲसिड | उत्तम | लिटर | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ओडोपीक पावडर | उत्तम | किलो | | | |
| १० | पांढरी डांबर गोळी | उत्तम | किलो | | | |
| ११ | रंगीत डांबर गोळी | उत्तम | नग | | | |
| १२ | खराटे | उत्तम | नग | | | |
| १३ | झाडू | उत्तम | नग | | | |
| १४ | रूम फ्रेशनर | उत्तम | नग | | | |
| १५ | तारेची घासणी | उत्तम | नग | | | |
| १६ | निरमा | उत्तम | नग | | | |
| १७ | बायडींग तार | उत्तम | नग | | | |

वरील दर श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर येथे पोहोच खर्च आणि सर्व प्रकारचे करासहीत आकारण्यात आले आहेत. तसेच सदर दराने दि.०१/०४/२०१९ ते दि.३१/०३/२०२० या कालावधीत स्वच्छता साहित्य पुरवठा करणेस मी बांधील राहील. तसेच याबाबतच्या आपणाकडून देण्यात आलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्यासंबंधीचे जरूर ते प्रतिज्ञापत्र रू.१००/— च्या स्टॅम्पपेपरवर करून देण्यास तयार आहे. तरी वर नमुद दरपत्रकाप्रमाणे स्वच्छता साहित्य पुरवठा करणेचे काम मला मिळण्यास विनंती आहे.

**दिनांक /०३/२०१९** **पुरवठाधारकाची सही व शिक्का**

**सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत**

१. पूर्वी स्वच्छता साहित्य पुरवठा केलेल्या कामाच्या अनुभवाची प्रमाणपत्रे.
२. स्वत:च्या ओळखपत्राची झेरॉक्स प्रत. (उदा. वाहन चालक परवाना, मतदान कार्ड व आधारकार्ड)
३. जीएसटी प्रमाणपत्र
४. मुंबई दुकाने व संस्था अधिनियमामध्ये असलेला परवाना.
५. पॅनकार्ड.
६. अनामत रक्कम रू.५,०००/— रोखीने भरलेबाबतची जमा पावती किंवा डि.डि.